राहुल गांधी यांच्या बाबत थंड पावले उचलणारी कॉंग्रेस

अरुण जेटली
विरोधी पक्षनेते(राज्यसभा)

कॉंग्रेस पक्षाने पंतप्रधानपदाचा उमेदवार न करण्याचा निर्णय घेतला आहे. त्याच्या ऐवजी कॉंग्रेसने असे जाहीर केले आहे की, निवडणूक प्रचार अभियान हे श्री राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली करण्यात येइल. कॉंग्रेस वर एका राजवंशाचे नियंत्रण किंवा वर्चस्व सतत घटत आहे ते आता पाहायला मिळत आहे. मागील २५ वर्षात गांधी परिवारातील एकही सदस्य या देशाचा पंतप्रधान बनला नाही. भारत देश खरोखर बदलत आहे. गांधी परिवार एका पक्षाचे नियंत्रण करू शकतो, पण राष्ट्रावर नियंत्रण करू शकत नाही. २००४ साली पराजयाला सामोरे जावे लागेल या भीतीने राजवंशाच्या सदस्यांना दूर ठेवण्यात आले होते. हेच कारण आहे कि २०१४ साली पंतप्रधान पदाचा उमेदवार म्हणून राहुल गांधी यांचे नाव घोषित करण्यात भीती वाटत आहे.
कॉंग्रेस चा हा मुळ हेतू नाही आहे. डिसेंबर-२०१३ मध्ये श्रीमती सोनिया गांधी यांनी पंतप्रधान पदाचा उमेदवार योग्य वेळी जाहीर करण्यात येईल असे सुतोवाच केले होते. नुकत्याच एका पत्रकार परिषदेत पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंह यांनी पंतप्रधान म्हणून श्री राहुल गांधी यांना आणण्यात येईल असे संकेत दिले होते. असे असताना कॉंग्रेस त्यांचे नाव अधिकृत रित्या जाहीर करण्यास का घाबरत आहे? कॉंग्रेसने प्रतिकूल परिस्थितीत लढण्याचा दृढ निर्धार गमावला आहे. हि बाब दिल्ली विधानसभा निवडणुकीत पण दिसून आली. श्री राहुल गांधी आणि कोण्या राष्ट्रीय नेत्याने दिल्लीतील निवडणूक प्रचारात हजेरी लावली नाही. ही घबराट आता आणखी दिसून येते. कशासाठी प्रतिकूल राजकीय वातावरणात प्रचार करण्याचा विचार आहे. प्रतिकुलतेसमोर लढण्यासाठी कॉंग्रेस भक्कम नाही. खास करून जेव्हा नरेंद्र मोदी यांच्याशी तुलना होते तेव्हा दोन व्यक्तिगत रेटिंग यांच्यात मोठी तफावत दिसून येते. हि कॉंग्रेससाठी वास्तविकता आहे. मग कशासाठी राहुल गांधी यांच्या नावाचा उल्लेख पंतप्रधान पदाचा उमेदवार म्हणून केला जात नाही.
पंतप्रधान यांनी हिम्मतिचे शब्द उच्चारले होते. त्यांनी २०१४ साल हे राहुल गांधी यांच्या विजयाचे आहे, असा उल्लेख केला होता. पराजयाचे खापर पण त्यांच्याच डोक्यावर टाकले आहे. मला शंका आहे कि, कॉंग्रेस पक्ष असे मानतो की गांधी परिवराकडून कधी चूक होणार नाही, किंवा निष्फळ ठरणार नाही. सल्लागार त्यांना खोटा सल्ला देत आहेत. कॉंग्रेस मध्ये गांधी परिवाराची पण काहीतरी जबाबदारी आहे. शेवटी ते पक्षाचे एक घटक आहेत.